International
Federation of
Library
Associations and Institutions

unesco
IFAP
Information for All Programme

# IFLA-UNESCO सार्वजनिक ग्रंथालय जाहीरनामा २०२२

स्वातंत्र्य, समृद्धी, आणि सामाजिक व वैयक्तिक विकास ही मूलभूत मानवी मूल्ये आहेत. आपले लोकशाही हक्क वापरण्याची आणि समाजात सक्रिय भूमिका बजावण्याची सुजाण नागरिकांची क्षमता याद्वारे ती प्राप्त केली जातात. रचनात्मक सहभाग व लोकशाहीचा विकास समाधानकारक शिक्षणावर तसेच ज्ञान, विचार, संस्कृती आणि ज्ञानाची मोफत आणि अमर्याद उपलब्धता व प्रवेशयोग्यता यावर अवलंबून आहे.

हे सार्वजनिक ग्रंथालय ज्ञानाचे स्थानिक प्रवेशद्वार असून, त्यामुळे आजीवन शिक्षण, स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता आणि वैयक्तिक व सामाजिक गटांचा सांस्कृतिक विकास यासाठी एक मूलभूत पाया तयार होतो. व्यावसायिक, तांत्रिक किंवा कायदेशीर अडथळ्यांशिवाय वैज्ञानिक आणि स्थानिक ज्ञानासह सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या निर्मितीसाठी आणि सामायिकरणासाठी उपलब्धता आणि प्रवेश देऊन निरोगी ज्ञानसंवर्धनात्मक समाजांसाठी आधार बनते.

प्रत्येक देशात, परंतु विशेषत: विकसनशील देशांत - शिक्षणाचा अधिकार आणि ज्ञानसंवर्धनात्मक समाजांत तसेच समाजाच्या सांस्कृतिक घडामोडींमध्ये सहभाग शक्य तितक्या लोकांपर्यंत पोहोचवणे या कार्यांत सार्वजनिक ग्रंथालयांची खात्रीशीर मदत होते.

शिक्षण, संस्कृती, सर्वसमावेशकता आणि माहितीसाठी एक जागृत शक्ती म्हणून, शाश्वत विकासासाठी आवश्यक प्रतिनिधी म्हणून आणि जनतेच्या मनात शांतीचा आणि आध्यात्मिक कल्याणाचा संचार व्हावा यासाठी आवश्यक घटक म्हणून हा जाहीरनामा सार्वजनिक ग्रंथालयात युनेस्कोच्या श्रद्धेची घोषणा आहे.

म्हणून, राष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाचे समर्थन करावे आणि सक्रियपणे सहभागी व्हावे यासाठी युनेस्को चे प्रोत्साहन आहे.

# सार्वजनिक ग्रंथालय

सार्वजनिक ग्रंथालय हे माहितीचे स्थानिक केंद्र आहे आणि वापरकर्त्यांना सर्व प्रकारचे ज्ञान आणि माहिती सहज उपलब्ध करून देते. जनतेने माहितीचा अर्थपूर्ण वापर करणे, आणि त्या माहितीपर्यंत सार्वत्रिक प्रवेश पुरवण्याच्या त्यांच्या आदेशाची पूर्तता करण्यासाठी, संप्रेषणाच्या नवीन माध्यमांशी सतत जुळवून घेणारे, ज्ञानसंवर्धनात्मक समाजाचे हे एक आवश्यक घटक आहे. ज्ञानाचे उत्पादन, माहिती आणि संस्कृतीची देवाणघेवाण व नागरी सहभाग यांना प्रोत्साहन देण्यासाठी, ग्रंथालय सार्वजनिकरित्या प्रवेशयोग्य जागा प्रदान करते.

ग्रंथालये समुदायाचे निर्माते आहेत. ती सक्रियपणे नवीन प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात आणि स्थानिक गरजा पूर्ण करणाऱ्या आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यात योगदान देणाऱ्या सेवांची रचना यांचे समर्थन करतात. यासाठी ती लक्षपूर्वक आणि सक्रियपणे जनतेचे बाजू समजून घेतात. जनतेचा आपल्या सार्वजनिक ग्रंथालयावर विश्वास असतो आणि त्या बदल्यात समुदायाला सक्रियपणे माहिती देणे आणि जागरूक ठेवणे ही सार्वजनिक ग्रंथालयाची महत्त्वाकांक्षा असते.

वय, वंश, लिंग, धर्म, राष्ट्रीयत्व, भाषा, सामाजिक स्थिती आणि इतर कोणत्याही गोष्टीचा विचार न करता सर्वांसाठी समान प्रवेशाच्या आधारावर सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवा प्रदान केल्या जातात. कोणत्याही कारणास्तव जे वापरकर्ते या नियमित सेवांचा लाभ घेऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी विशिष्ट सेवा आणि सामग्री तयार करून दिली जावीत. उदाहरणार्थ: भाषिक अल्पसंख्यक, अपंग, डिजिटल किंवा संगणक कौशल्य कमी असलेले, साक्षरता कमी असलेले आणि हॉस्पिटल येथील रुग्ण किंवा तुरुंगातील कैदी.

आपल्या गरजांशी संबंधित सामग्री सर्व वयोगटांना उपलब्ध असावी. संग्रह आणि सेवांमध्ये सर्व प्रकारांच्या योग्य माध्यमांचा आणि आधुनिक तंत्रज्ञान व पारंपारिक साहित्याचा समावेश असावा. उच्च गुणवत्ता, स्थानिक गरजांशी आणि परिस्थितींशी सुसंगती असणे तसेच समुदायाची लोकभाषा आणि सांस्कृतिक विविधता दर्शविणे मूलभूत आहे. वर्तमान प्रवृत्ती आणि समाजाची उत्क्रांती तसेच मानवी प्रयत्नांची आणि कल्पनेची स्मृती, सामग्रीद्वारे प्रतिबिंबित व्हावी.

संग्रह आणि सेवा कोणत्याही प्रकारच्या वैचारिक, राजकीय किंवा धार्मिक सेन्सॉरशिप किंवा व्यावसायिक दबावाच्या अधीन नसाव्यात.

## सार्वजनिक ग्रंथालयाची उद्दिष्टे

माहिती, साक्षरता, शिक्षण, सर्वसमावेशकता, नागरिक सहभाग आणि संस्कृती यांच्याशी संबंधित खालील प्रमुख उद्दिष्टे सार्वजनिक ग्रंथालय सेवांच्या केंद्रस्थानी असावीत. या प्रमुख उद्दिष्टांद्वारे, "शाश्वत विकास उद्दिष्टे" आणि अधिक न्याय्य, मानवीय आणि शाश्वत समाजांच्या निर्मितीमध्ये सार्वजनिक ग्रंथालये आपले योगदान देतात.

- सेन्सरशिप-मुक्त आणि व्यापक माहिती व कल्पना यांपर्यंत प्रवेश प्रदान करणे, सर्व स्तरांवर औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचे समर्थन करणे तसेच आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर जनतेसाठी सातत्याने, स्वैच्छिक आणि स्वयं-आचारित ज्ञानार्जन करण्यासाठी निरंतर शिक्षणाची तरतूद करणे;

- वैयक्तिक सर्जनशील विकासाची संधी उपलब्ध करून देणे, आणि कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, कुतूहल आणि सहानुभूतीला उत्तेजन देणे;

- जन्मापासून ते प्रौढत्वापर्यंत मुलांना वाचनाची सवय लावणे आणि ती मजबूत बनवणे;

- माहितीपूर्ण लोकशाही समाज तयार करण्याच्या भावनेने; वाचन आणि लेखनकौशल्य विकसित करण्याच्या हेतूने साक्षरता उपक्रम आणि कार्यक्रमांमध्ये पुढाकार घेणे, त्यांचे समर्थन करणे आणि त्यांत सहभागी होणे, प्रत्येक वयोगटातील जनतेसाठी मीडिया आणि माहिती साक्षरता आणि डिजिटल साक्षरता कौशल्यांचा विकास सुलभ करून देणे;

- जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा माहिती, संग्रह आणि कार्यक्रमांमध्ये प्रवेश प्रदान करून देऊन डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे वैयक्तिकपणे आणि दूरस्थपणे जनसमुदायाची सेवा करणे;

- सामाजिक जडणघडणीच्या केंद्रस्थानी असलेल्या ग्रंथालयाच्या भूमिकेला मान्यता देऊन जनतेला सर्व प्रकारच्या सामुदायिक माहितीपर्यंत प्रवेश प्रदान करून देणे आणि समुदाय संघटित होण्याची संधी देणे;

- संशोधनाचे निकाल, वापरकर्त्यांच्या आयुष्यावर परिणामकारक असलेली आरोग्यविषयक माहिती, यासारखी वैज्ञानिक माहिती आपल्या जनसमुदायांना उपलब्ध करून देणे, आणि वैज्ञानिक प्रगतीमध्ये त्यांना सामावून घेणे;

- स्थानिक उपक्रम, संघटना आणि स्वारस्य असलेल्या जनतेला सेवा म्हणून पुरेशी माहिती देणे;

- स्थानिक आणि मूलभूत स्वदेशी माहिती, ज्ञान आणि सांस्कृतिक वारसा (मौखिक परंपरेसह) यांचे जतन करणे, जनतेच्या इच्छेनुसार सामग्री ओळखणे, जोपासणे आणि सामायिक करणे ह्यात स्थानिक समुदाय सक्रिय भूमिका घेऊ शकेल असे वातावरण निर्मित करणे;

- आंतर-सांस्कृतिक संवाद वाढवणे आणि सांस्कृतिक विविधतेला महत्त्व देणे;

- सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि वारसा यांच्या संरक्षणाचा आणि अर्थपूर्ण उपलब्धतेचा प्रचार करणे, कलांचे कौतुक करणे, जसे पारंपारिक माध्यमांतून व्यक्त केले जाते तसे वैज्ञानिक ज्ञान, संशोधन आणि नवकल्पना यांची खुली उपलब्धी करून देणे आणि डिजीटाइज केलेल्या आणि मूळ स्वरूपात डिजिटल असलेल्या सामग्रीचा प्रचार करणे.

## वित्तपुरवठा, कायदे आणि संस्था (नेटवर्क)

सार्वजनिक ग्रंथालयात प्रवेश आणि सेवा तत्त्वतः विनामूल्य असतील. सार्वजनिक ग्रंथालय स्थानिक आणि राष्ट्रीय प्राधिकरणांची जबाबदारी आहे. ते आंतरराष्ट्रीय करार आणि करारांशी संरेखित विशिष्ट आणि अद्ययावत कायद्याद्वारे समर्थित असणे आवश्यक आहे. त्याला राष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांनी वित्तपुरवठा केला पाहिजे. संस्कृती, माहितीची तरतूद, साक्षरता आणि शिक्षणासाठी कोणत्याही दीर्घकालीन धोरणाचा तो एक आवश्यक घटक असावा.

डिजिटल युगात प्रताधिकार (कॉपीराइट) आणि बौद्धिक संपदा कायद्याने हे सुनिश्चित केले पाहिजे की जशी भौतिक संसाधनांच्या बाबतीत असते, तशी सार्वजनिक ग्रंथालयांना वाजवी अटींवर डिजिटल सामग्री मिळविण्याची आणि प्रवेश देण्याची समान क्षमता असावी.

राष्ट्रव्यापी ग्रंथालय समन्वय आणि सहकार्य सुनिश्चित करण्यासाठी कायदे आणि धोरणात्मक योजनांनी सेवांच्या मान्य मानकांवर आधारित राष्ट्रीय ग्रंथालय संस्था (नेटवर्क) परिभाषित करावी आणि त्यास प्रोत्साहन द्यावे.

सार्वजनिक ग्रंथालयांची रचना राष्ट्रीय, प्रादेशिक, संशोधनात्मक आणि विशेष ग्रंथालये तसेच शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील ग्रंथालयांच्या संदर्भात असावी.

## कार्य आणि व्यवस्थापन

स्थानिक समुदायाच्या गरजांच्या संदर्भात उद्दिष्टे, प्राधान्यक्रम आणि सेवा परिभाषित करून एक स्पष्ट धोरण तयार केले पाहिजे. या प्रक्रियेसाठी स्थानिक ज्ञान आणि समुदायाच्या सहभागाचे महत्त्व मौल्यवान आहे आणि स्थानिक समुदायांचा निर्णय प्रक्रियेत त्याचा समावेश असावा.

सार्वजनिक ग्रंथालय प्रभावीपणे आयोजित केले जावे आणि कामकाजाची व्यावसायिक मानके राखली जावीत.

समाजातील सर्व सदस्यांसाठी ग्रंथालयाच्या सेवा भौतिक किंवा डिजिटल स्वरूपात प्रवेशयोग्य असणे आवश्यक आहे. यासाठी चांगल्या ठिकाणी असलेल्या आणि पुरेपूर रित्या सुसज्ज असलेल्या ग्रंथालयाच्या इमारती, वाचन आणि अभ्यासाच्या चांगल्या सुविधा, तसेच संबंधित तंत्रज्ञान आणि वापरकर्त्यांना सोयीस्कर कामकाजाची वेळ, हे असणे आवश्यक आहे. हे सूचित करते की ग्रंथालयात जे प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत त्या जनतेपर्यंत पोचण्यासाठी आउटरीच सेवा असाव्यात.

ग्रामीण आणि शहरी भागातील समुदायांच्या विविध गरजा, तसेच उपेक्षित गट, विशेष गरजा असलेले वापरकर्ते, बहुभाषिक वापरकर्ते आणि समुदायातील स्थानिक लोकांच्या गरजांशी ग्रंथालयाच्या सेवा सुसंगत असाव्यात.

डिजिटल आणि पारंपारिक - दोन्ही स्वरूपांच्या वापरकर्त्यांमध्ये आणि संसाधनांमध्ये ग्रंथपाल हा सक्रिय मध्यस्थ आहे. पुरेशी मानवी आणि भौतिक संसाधने, तसेच वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी ग्रंथपालाचे व्यावसायिक आणि निरंतर शिक्षण, पुरेशा सेवा सुनिश्चित करण्यासाठी अपरिहार्य आहेत. पुरेशा संसाधनांच्या परिमाणवाचक आणि गुणात्मक व्याख्येसाठी नेत्यांनी ग्रंथालय व्यावसायिकांशी सल्लामसलत करावी.

वापरकर्त्यांना सर्व संसाधनांचा लाभ घेता यावा या हेतूने मदत करण्यासाठी वापरकर्त्यांपर्यंत व्यापक रित्या पोचणे (आऊटरीच) आणि वापरकर्ता शिक्षण कार्यक्रम प्रदान करणे आवश्यक आहे.

धोरण निर्मात्यांना ग्रंथालयाचा सामाजिक फायदा दर्शविण्यासाठी, वर्तमान संशोधनाने ग्रंथालयाच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे आणि डेटा गोळा करणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सांख्यिकीय डेटा दीर्घकालीन रित्या गोळा केला पाहिजे, कारण समाजातील ग्रंथालयाचे फायदे भावी पिढ्यांमध्ये दिसून येतात.

## भागीदारी

व्यापक आणि अधिक वैविध्यपूर्ण जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रंथालयांना भागीदाऱ्या प्रस्थापित करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे संबंधित भागीदारांसह सहकार्य असावे - उदाहरणार्थ, वापरकर्ता गट, शाळा, गैर-नफा संस्था, ग्रंथालय संघटना, व्यवसाय आणि स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर व्यावसायिक - याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

## जाहीरनाम्याची अंमलबजावणी

राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर निर्णय घेणारे आणि जगभरातील ग्रंथालय समुदाय यांना या जाहीरनाम्यात व्यक्त केलेल्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यास आवाहन केले जात आहे.

१८ जुलै २०२२